



दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

प्रतिनिधी नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा
९४०३६ ४१४८२
राहुल मारोतीराव वाईकर

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | बुधवार १६ ऑक्टोबर २०२४ | अंक ३१० ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु


# निवडणुकीच्या तारखा घोषित होताच जरांगे पाटील संतापले, आपली ताकद दाखवा, मराठ्यांनो जागे व्हा!

**बीड प्रतिनिधी :- गोकुळ इंगोले**

राज्यात विधानसभा निवडणुकीची घोषणा झाली आहे. २० नोव्हेंबर रोजी राज्यात एकाट टप्प्यात मतदान होणार असून २३ नोव्हेंबर रोजी निकाल लागणार आहे. त्याआधी मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा मराठा आरक्षणावरुन देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली आहे. मनोज जरांगे म्हणाले की, 'शेवटचं सांगतो. प्रतिष्ठेची लढाई आहे. या राज्यात एक बाप आणि माय नाही की तिला वाटत नाही की आपलं पोरगं मोठं व्हावं. एक भाऊ नाही की त्याला वाटत नाही बहीण मोठी होऊ नये. प्रत्येक माय बापाला मुलं मोठी व्हावी वाटत आहे. या सरकारने आपल्या लढाईत बेदखल केलं.' 'आपला अपमान केला. आपल्याला हिणवलं. आपल्याला खुन्नस म्हणून इतर १७ जाती ओबीसीत घातल्या. आपल्याला चॅलेंज आहे. आपल्याला ते आरक्षण देणार नाही. त्यामुळे तुम्ही ठरवा आता तुम्हाला जात मोठी करायची, मुलगा मोठा करायचा की जातीचा आमदार मोठा करायचा. तुमची मुलगी आणि मुलगा नरक यातना सोसत आहे. त्याचा आक्रोश आहे.' 'तुमचा मुलांचा आक्रोश सरकारने जाणला नाही. तुमची लेकरं मेले तरी त्यांना घेणंदेणं नाही,



तुमच्या जमिनी गेल्या तरी त्यांना घेणं नाही. मराठ्यांची पोरं मोठी होऊ नये याचा पण त्यांनी घेतला आहे. त्यांना तुमची मुलं भिकारी करायचे आहे. त्यामुळे आता तुमच्या हातात आहे. आपली ताकद दाखवा. मराठ्यांनो जागे व्हा. मी सांगतो म्हणून नाही. तुम्ही कोणत्याही पक्षात असा. तुम्ही आज संध्याकाळी मुलाल जवळ घेऊन बसा. त्याला आरक्षणाचं महत्त्व विचारा. त्यावरून तुम्हाला आरक्षणाचं महत्त्व कळे. फडणवीसने तुमच्या मुला मुलींना संपवण्याचं ठरवलं आहे. अशा लोकांना निवडून दिलं तर तुम्ही तुमच्या मुलांची अग्निपरीक्षा पाहत आहात.' 'तुम्हाला मनात आणि मतात फरक करावा लागेल. तुम्ही पक्षांच्या बाजूने राहिला, तुम्ही आमदारांच्या बाजूने राहिला आणि जातीसाठी जागला नाही तर या जगात तुम्हाला रडायलाही जागा राहणार नाही. त्यामुळे तुम्हाला काय करायचं ते ठरवा.'

'मराठा आरक्षणाचा मुडदा पाडण्याचं काम सरकार करणार नाही असं वाटत होतं. पण सरकारने आम्हाला फसवलं. आंदोलन आणि मराठा समाज एक ठेवायचा नाही, त्यांना आरक्षण द्यायचं नाही. मराठा समाज बलाढ्य आहे, त्यांना मोठं होऊ द्यायचं नाही. मराठ्यांची पोरं भिकारी राहिले पाहिजे. ते पुढे येता कामा नये हे वचन देवेंद्र फडणवीस यांनी उचललं होतं. सत्ता मात्र मराठ्यांनी दिली', असं म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधला. पुढे ते असेही म्हणाले की, सत्तेचा गैरवापर करून फडणवीस यांनी काम केलं आणि मराठ्यांची मुलं भिकारी झाली पाहिजे या तत्त्वाने द्वेषाने आणि आकसाने फडणवीस मराठ्यांशी वागले. त्यांनी त्यांची चाल यशस्वी केली. निर्णय घ्यायचं त्यांच्या हातात होते. सत्ता त्यांच्या हातात होती. मराठ्यांना डिवचण्याचं काम केलं. मराठ्यांच्या नशिबाला हात घातला. ओबीसीमध्ये नव्या १७ जाती घातल्या पण मराठ्यांना आरक्षण दिलं नाही. ही खुन्नस फडणवीस यांनी दिली. हे मराठ्यांना आरक्षण देणार नाही हे लक्षात आलं होतं. कारण आम्ही एवढे गाफील नाही. आम्हाला कळत होतं. पण क्षत्रियांचा धर्म असतो शेवटच्या क्षणापर्यंत विश्वास ठेवा. काहीही घडू शकतो. या भूमिकेतून आम्ही विश्वास ठेवला. कारण लढाईत शेवटच्या क्षणापर्यंत काहीही होऊ शकतं. पण शेवटी त्यांनी करायचं तेच केलं. त्यांच्या पोटात जे बरबटलेले विचार होते ते बाहेर आणलेच. शेवटी आचारसंहिता करून मराठ्यांचं वाटोळं केलं', असा हल्लाबोलही मनोज जरांगे पाटील यांनी सरकारसह देवेंद्र फडणवीस यांच्यावर केला.



# बीडच्या खासदारांचे मुख्यमंत्र्यांना पत्र! ट्रेनी शिक्षकांचा कालावधी वाढविण्याची केली मागणी

बीड/प्रतिनिधी शासनाने 'मुख्यमंत्री' युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंर्गत ट्रेनी शिक्षक पदभरती केलेली आहे.त्याचा कालावधी सहा महिन्यांचा आहे.परंतू या कालावधीत शैक्षणिक वर्ष पूर्ण होत नाही. त्यामुळे वाढीव कालावधी देवून निवड झालेल्या ट्रेनी शिक्षकांना दिलासा द्यावा.अशा मागणीचे पत्र खा.बजरंग सोनवणे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिले आहे.

राज्य शासनाकडून 'मुख्यमंत्री' युवा कार्य प्रशिक्षण योजना कार्यान्वित आहे. त्या योजनेच्या माध्यमातून राज्यातील जिल्हा परिषद शाळेत ट्रेनी शिक्षकांची पदभरती करण्यात आली आहे. मात्र शैक्षणिक वर्ष पाहता, सहा महिन्यांचा कालावधी पूर्ण होत नाही.त्यामुळे 'मुख्यमंत्री' युवा कार्य प्रशिक्षण योजनेचा कालावधी वाढविणे आवश्यक आहे.असे निवेदन प्रशिक्षणार्थींनी माझ्याकडे दिले आहे.त्या निवेदनातून त्यांनी विनंती केली आहे की, खासदार या नात्याने आमची मागणी राज्य सरकारकडे कळवावी आणि ट्रेनी शिक्षकांना न्याय मिळवून द्यावा.

बीडसह राज्यातील ट्रेनी शिक्षकांचा हा प्रश्न लक्षात घेता, त्यांची मागणी योग्य आणि रास्त आहे.त्यामुळे 'मुख्यमंत्री' युवा कार्य प्रशिक्षण योजनेचा कालावधी पूर्ण होण्यासाठी संबंधित विभागास आदेशीत करावे.असे पत्र खा.बजरंग सोनवणे यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिले आहे.

बेरोजगार युवकांच्या हाताला काम मिळावे, त्यासाठी राज्य शासनाने 'मुख्यमंत्री'युवा कार्य प्रशिक्षण योजना राज्यात सुरु केली.परंतु सदरील योजना राबवित असतांना ती पूर्णपणे यशस्वी होते का? हे पाहणे महत्वाचे आहे. मात्र प्रशिक्षणार्थी यांच्या निवेदनातून स्पष्ट होते की, या योजनेचा कालावधी शैक्षणिक वर्षात पूर्ण होत नाही. ही बाब लक्षात घेवून खा. बजरंग सोनवणे यांनी मुख्यमंत्री यांना पत्र पाठवून कालावधी वाढविण्याची मागणी केली.त्यामुळे ट्रेनी शिक्षकांना दिलासा मिळणार आहे.

## एस. टी. चालक, वाहक, कर्मचाऱ्यांसाठी मोफत बी. पी., शुगर, नेत्रतपासणी, चष्मे वाटप, मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर! रोटरी मिडटाऊन व अनिलदादा जगताप मित्रमंडळाचा स्तुत्य उपक्रम

बीड, प्रतिनिधी- सामाजिक कार्यात कायम प्राधान्याने पुढाकार घेत असलेल्या रोटरी मिडटाऊन आणि अनिलदादा जगताप मित्रमंडळाच्या संयुक्त विद्यमाने एस. टी. चालक, वाहक, कर्मचाऱ्यांसाठी मोफत बी. पी., शुगर, नेत्रतपासणी, चष्मे वाटप, मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीराचे दिनांक १६/१०/२०२४ व १७/१०/२०२४ रोजी सकाळी १०.०० ते ४.०० यावेळेत बस स्थानक परिसरात आयोजन करण्यात आले आहे. एस. टी. चालक, वाहक, कर्मचारी हे अहोरात्र प्रवश्यांसाठी तत्पर सेवा देत असतात, त्यामध्ये त्यांचे शरीराकडे अगदी दुर्लक्ष होत राहते असं म्हंटलं तर वावगं ठरणार नाही. एस टी चा प्रवास सुखाचा प्रवास हे ब्रीद वाक्य उराशी घेवून हे कर्मचारी काम करत असतात. मागे अशीच बातमी वाचण्यात आली की, चालकाला हृदय विकाराचा झटका आला तरी त्यांने प्रसंगावधान राखून गाडीतील प्रवशांचा जीव वाचवला. असे प्रकार होवू नये म्हणून म्हणतात ना प्रिव्हेनशन इज बेटर द्यान क्युअर या उद्देशाने एस. टी. चालक, वाहक, कर्मचाऱ्यांसाठी मोफत बी. पी., शुगर, नेत्रतपासणी, चष्मे वाटप, मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर रोटरी मिडटाऊन व अनिल दादा जगताप मित्रमंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक१६/१०/२०२४ व १७/१०/२०२४ रोजी सकाळी १०.०० ते ४.०० यावेळेत बस स्थानक परिसरात घेण्यात येणार आहे. या शिबीरामध्ये सर्व तपासण्या या चंपावती नेत्रालय येथील तज्ञ डॉक्टर व रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊनचे तज्ञ डॉक्टर करणार आहेत. यामध्ये



चंपावती नेत्रालय येथील तज्ञ डॉक्टर डॉ. नारायण आळणे, डॉ. प्रदिप सानप, डॉ. रविंद्र गालफाडे व त्यांची टीम तसेच रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन चे तज्ञ डॉ. रो. किरण सवासे, रो. डॉ. निलेश जगदाळे हे सेवा देणार आहेत. या शिबीरामध्ये तपासणी केल्यावर मोफत नंबरचे चष्मे देण्यात येणार आहेत, तसेच बी. पी. शुगर हे देखील मोफत तपसण्यात येणार असून त्यांना त्यानुसार योग्य तो सल्ला देण्यात येणार आहे. विशेष म्हणजे ज्या तपासणी केलेल्या चालक वाहक व कर्मचारी यांना मोतिबिंदू चे निदान होईल अशाचे मोतिबिंदू चे ऑपरेशन देखील मोफत करण्यात येणार आहे. रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन व अनिल दादा जगताप मित्र मंडळ हे दोन्ही सामाजिक, सांस्कृतिक व आरोग्य विषयक सामाजिक उपक्रम घेत असतात यावेळी या दोन्ही सामाजिक संघटनाच्या संयुक्त विद्यमाने हा एस.टी. चालक, वाहक व इतर कर्मचारी यांच्यासाठी हा अत्यंत महत्वाचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे तरी सर्व ,एस.टी. चालक, वाहक व इतर कर्मचारी यांनी या शिबीराचा लाभ घ्यावा असे आव्हान दोन्ही संघटनाच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे. ०००००

## सात सदस्यांनी घेतली विधानपरिषद सदस्यत्वाची शपथ



मुंबई, दि. १५ : महाराष्ट्र विधानपरिषदेसाठी राज्यपाल नामनियुक्त सात सदस्यांनी विधान परिषद सदस्यत्वाची आज शपथ घेतली. सदस्य हेमंत श्रीराम पाटील, पंकज छगन भुजबळ, श्रीमती मनीषा कायंदे, इद्रिस इलियास नाईकवाडी, विक्रांत पाटील, धर्मगुरू बाबुसिंग महाराज राठोड, श्रीमती चित्रा किशोर वाघ यांना विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांनी सदस्यत्वाची शपथ दिली. विधान भवन, मुंबई येथील मध्यवर्ती सभागृहात दुपारी १२ वाजता हा शपथविधी सोहळा संपन्न झाला.

## एका महिन्यात तब्बल:बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणात चौकशीतून धक्कादायक माहिती उघड

माजी आमदार आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दीकी यांची शनिवारी दसऱ्याच्या दिवशी निर्घृण हत्या करण्यात आली. वांद्र्यातील मुलाच्या निर्मल नगर येथील कार्यालयाबाहेर बाबा सिद्दीकी यांच्यावर गोळ्या झाडण्यात आल्या. रक्ताच्या थारोळ्यात कोसळलेल्या बाबा सिद्दीकी यांना लिलावती रुग्णालयात नेण्यात आलं. पण डॉक्टरांनी तपासल्यानंतर त्यांना मृत घोषित केलं. या प्रकरणात पोलिसांनी काही आरोपींना अटक केली आहे. त्यांच्या चौकशीतून धक्कादायक माहिती



उघड झाली आहे. संशयित शूटर्सनी मागच्या महिन्याभरात तब्बल 10 वेळा वांद्रे परिसरात बाबा सिद्दीकी यांच्या हत्येचा अयशस्वी प्रयत्न केला होता. पोलिसांनी ही माहिती दिली आहे. टाइम्स ऑफ इंडियाने हे वृत्त दिलं आहे. "मोकळी जागा असल्याने मुलाच्या खेरवाडी येथील ऑफिसजवळ सिद्दीकी यांची हत्या करा, असं त्यांना सांगण्यात आलं होतं" असं वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने सांगितलं. वेगवेगळ्या कारणांमुळे त्यावेळी त्यांना गोळीबार करण्याची संधी मिळाली नाही. अनेकदा सिद्दीकी आले नाहीत. काहीवेळा सिद्दीकी यांच्या अवती-भवती त्यांचे बरेच समर्थक असायचे. त्यामुळे हल्लेखोरांना आपला प्लान बदलावा लागला"

## विद्यार्थ्यांनी वाचन संस्कृती जोपासायला हवी – डॉ. युवराज मुळये

माजलगाव प्रतिनिधी दिनांक १५/१०/२०२४विद्यार्थ्यांनी वाचन संस्कृती जोपासायला हवी असे प्रतिपादन उपप्राचार्य डॉ.युवराज मुळये यांनी केले. श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात ग्रंथालय शास्त्र विभागाच्या वतीने आयोजित वाचन प्रेरणा दिन कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, भारताचे माजी राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस सर्व भारतभर वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा केला जातो. परंतु हल्लीच्या काळामध्ये मल्टिमीडियाच्या जमान्यात मोबाईल वापरावर सर्वात जास्त भर ही युवा पिढी देत आहे. त्यामुळे वाचन संस्कृती लोप पावत चालली आहे. याचा परिणाम म्हणजे विद्यार्थी ज्ञानपिपासु न होता प्रसिद्धीस हापापलेला असल्याचे दिसून येते. सध्याची पिढी जर पाहिली तर ती ज्ञानसंपन्न दिसून येत नाही यासाठी डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा आदर्श घेऊन विद्यार्थ्यांनी वाचन संस्कृती झोपायला हवी असे ते म्हणाले.

अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे म्हणाले की आजच्या काळामध्ये आपण पाहतो की, ग्रंथालयामध्ये विद्यार्थी न दिसून येता दिवस रात्र मोबाईलच्या



विळख्यामध्ये अडकून पडला आहे यासाठी त्याचा मानसिक व शारीरिक विकास न होता उलट त्याचे मानसिक संतुलन बिघडत जाऊन विघातक कृत्याकडे तो वळत आहे. यापासून युवा पिढीला जर वाचवायचे असेल तर वाचन संस्कृती ही अनमोल आहे आणि तीच संस्कृती आपले आयुष्य वाचवू शकते असे ते म्हणाले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथपाल प्रा. सुरेश बनसोडे यांनी केले. सूत्रसंचालन स्टाफ सेक्रेटरी डॉ. गंगाधर उषमवार यांनी केले तर आभार डॉ. प्रेम राठोड यांनी मानले. या कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. गजानन होन्ना, प्रा.अंकुश साबळे, कार्यालय अधीक्षक श्री. विजय कुलकर्णी, तसेच ग्रंथालय विभागातील कर्मचारी श्री. सुरेश निवडूंगे, श्रीमती अरुणा डोंगरे व महाविद्यालयातील प्राध्यापक तसेच विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

# रामहरी मेटे यांनी बीड विधानसभा निवडणूक लढवावी !

## जय शिवसंग्रामच्या बीड विधानसभा आढावा बैठकीत कार्यकर्त्यांचा एकमुखी निर्णय !!

बीड प्रतिनिधी जय शिवसंग्राम पक्षाचे संस्थापक रामहरी भैया मेटे यांनी बीड विधानसभा निवडणूक महायुती कडून उमेदवारी मिळाल्यास अथवा स्वबळावर जय शिवसंग्राम पक्षातर्फे लढवावी असा एकमुखी निर्णय जय शिवसंग्रामच्या बीड विधानसभा आढावा बैठकीमध्ये कार्यकर्त्यांनी घेतला आहे. त्यामुळे आता येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत हे मेटे कोणाची डोकेदुखी वाढवतात हे लवकरच स्पष्ट होणार आहे. जय शिवसंग्राम पक्षाची स्थापन होऊन केवळ 11 महिने झालेले आहेत. पक्षाचे संस्थापक रामहरी भैया मेटे यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण राज्यभरात पक्षाने



आपली ताकद अगदी कमी कालावधीमध्ये उभी केली आहे. एवढेच नव्हे तर महायुतीमध्ये घटक पक्ष म्हणून लोकसभेला मान्यता देखील मिळवण्यात यश मिळवले आहे. त्यामुळे येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत जय शिवसंग्रामने बीड विधानसभा मतदारसंघासह पाच मतदार संघावर दावा केला आहे. यामध्ये मुंबई वर्सोवा मतदार संघामधून दीपक कदम अहमदनगर जिल्ह्यातील नेवासा मतदार संघातून सुरेश शेटे नांदेड जिल्ह्यातील कंधार मतदार संघातून उमेश पाटील पुणे जिल्ह्यातील दौंड मतदार संघातून वसंत साळुंखे तर बीड विधानसभा मतदारसंघातून जय शिवसंग्राम चे संस्थापक रामहरी भैया मेटे यांना महायुतीने उमेदवारी द्यावी अशी मागणी भाजपाकडे जय शिवसंग्राम ने केली आहे. दरम्यान बीड येथील शासकीय विश्रामगृह येथे 15 ऑक्टोंबर रोजी सकाळी जय शिवसंग्राम चे संस्थापक अध्यक्ष रामहरी भैया मेटे यांच्या अध्यक्षतेखाली बीड विधानसभेची आढावा बैठक संपन्न झाली या बैठकीला बंडू बापू शहाणे राहुल बनगर नवनाथ मोरे शेख शहनाज राज चौरे पिल्लू डांगे विष्णू डोईफोडे सागर नवले परशुराम थोटे यासह पक्षाचे प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी तमाम पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी जय शिवसंग्राम चे संस्थापक रामहरी भैया मेटे यांनी लोकनेते स्वर्गीय विनायकराव मेटे यांचे बीड विधानसभा निवडणुकीतून आमदार होण्याचे राहिलेले अधोरे स्वप्न पूर्ण करून त्यांच्या स्वप्नातील बीड मतदार संघाचा विकास करण्यासाठी विधानसभा निवडणुकीच्या आखाड्यात उतारावे जर महायुतीने घटक पक्ष म्हणून जय शिवसंग्राम तर्फे उमेदवारी दिली नाही तर विधानसभा निवडणुकीत जय शिवसंग्राम ला महायुतीने फक्त गृहीत धरू नये जय शिवसंग्रामने विधानसभा निवडणुकीत बीड विधानसभेसह राज्यातील पाच विधानसभा निवडणुका स्वबळावर लढवाव्यात असा एकमुखी निर्णय घेण्यात आला आहे.

### मेटेंचे आमदार होण्याचे स्वप्न कोण करणार पूर्ण ?

लोकनेते स्वर्गीय विनायकराव मेटे यांनी बीड विधानसभा निवडणुकीत मतदारांचा अभूतपूर्व विश्वास संपादित केलेला होता. त्यांचा पराभव अगदी निसटता झालेला होता. त्यामुळे बीड विधानसभा निवडणुकीत आमदार होण्याचे मेटे साहेबांनी पाहिलेले स्वप्न अधूरे राहिले गेले. त्यांचे अपूर्ण स्वप्न आता नेमके कोणते मेटे पूर्ण करणार ? याकडे बीड विधानसभा निवडणुकीचे लक्ष वेधणार आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
बुधवार १६ ऑक्टोबर २०२४
https://lokaarambh.com



## नवरात्रीत साहित्यसंपदातर्फे उत्सव तिच्या प्रतिभेचा झाला संपन्न

नवरात्रीचे औचित्य साधून साहित्यसंपदातर्फे स्त्री शक्तीचा जागर ‘उत्सव तिच्या प्रतिभेचा’ उपक्रमा अंतर्गत केला जातो.साहित्यसंपदा संस्थापक वैभव धनावडे ह्यांच्या संकल्पनेतून निर्माण झालेल्या सदर उपक्रमाचे हे चौथे वर्ष होते .समाजात विशेष योगदान देणाऱ्या स्त्रियांना समाजापुढे आणणं आणि त्यांना पाठबळ देणे हा प्रमुख उद्देश बाळगून ‘ओळख नवं दुर्गेची ‘उपक्रमा अंतर्गत त्यांची माहिती लेख स्वरूपात प्रसिद्ध करण्यात येते .महिलांना उपयोगी विविध मार्गदर्शनपर वर्गांचे आयोजन केले जाते.आर्थिक नियोजन,शाररिक आणि मानसिक आरोग्य ,कायदेविषयक अधिकार,व्यक्तिमत्व विकासपर विषयांवर माहिती वर्गांचे आयोजन पार पडते.महिलांच्या सुप्त कलागुणांना वाव देणाऱ्या विविध स्पर्धांचे आयोजन देखील केले जाते. या वर्षी ‘ओळख नवं दुर्गांची ‘ या उपक्रमा अंतर्गत स्वतःची ओळख निर्माण करू पाहणाऱ्या श्री टिफिन सर्व्हिसेस सीमा पाटील ,मुलांसाठी संस्कारसंपदा उपक्रम राबविणाऱ्या सलोनी बोरकर,साहित्यिक चळवळीस हातभार लावणाऱ्या सुप्रिया जोशी,स्मिता हर्डीकर,डॉ.सुवर्णा पाटील,कविता झुंजारराव,सामाजिक कार्यकर्त्या जीविता पाटील,स्मित गायकवाड आणि इतरही स्त्रियांची ओळख लेख स्वरूपात प्रसिद्ध करण्यात आली.

वयाच्या विविध टप्प्यात उपयुक्त होतील अश्या विषयांवर महिलांसाठी ऑनलाईन मार्गदर्शनपर वर्गांचेही आयोजन करण्यात आले होते त्या अंतर्गत ‘स्मृतिभ्रंश’ आजारावर डॉ. सुवर्णा पाटील भडगाव ह्यांनी उपस्थितांना सदर आजाराची माहिती देऊन उपाय योजना सांगितली. आजकाल वाढलेल्या सायबर गुह्यांनी महिला वर्ग त्रासलेला असल्याने डॉ. प्रवीण घोसेकर ,नागपूर यांनी ‘सायबर सुरक्षा काळाची गरज’ विषयावर सांगताना आजकालचे होणारे विविध प्रकारचे होणारे ऑनलाईन फ्रॉड सांगून घ्यावयाची काळजी सांगितली . सौन्दर्यविषयक जाहिरातींच्या विश्वात अडकून फसणाऱ्या महिलांना जनजागृतीसाठी मुंबई पार्ले येथतील खूबसूरत पार्लर संचालिका अपेक्षा बिडकर ह्यांनी ‘आजची ब्युटी इंडस्ट्री आणि डू इट युवर सेल्फ वास्तव’ या विषयावर मार्गदर्शन केले.

अनेक पालकांना भेडसाविणाऱ्या मुलांच्या मौखिक आरोग्या बाबत माहिती देताना ‘लहान मुले आणि दुधाचे आजार’ या बाबीवर डॉ.अस्मिता कदम कोल्हापूर ह्यांनी प्रकाश टाकला. आजकालच्या धकाधकीच्या जीवनात तणावला सामोरे जाताना लागणाऱ्या जीवनपद्धतीचे मार्गदर्शन करताना नाशिक येथील मंजुषा पुरंदरे ह्यांनी ‘स्त्री स्वास्थ आणि योगसाधना’ संदर्भात आपल्या सत्रातून महिलांना योगसाधनेतून निरोगी राहण्याविषयी जनजागृती केली. सर्व सत्रांस महाराष्ट्रातील विविध भागातील महिलांची उपस्थिती ऑनलाईन पद्धतीने लाभली. समस्त महिला वर्गाकडून परीक्षकांचे आभार मानण्यात आले.

नुकताच मराठीला अभिजात दर्जा प्राप्त झाला आहे.मराठी भाषेत काव्य क्षेत्रात योगदान देणाऱ्या विविध कवयित्रींची ओळख नवरात्रीचे औचित्य साधून साहित्यसंपदा संस्थापक ह्यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या ‘ओळख सरस्वतींची’ या विशेष उपक्रमातून तरुण पिढीला करून देण्यात आली.कान्होपात्रा,बहिणाबाई ते आजकालच्या प्रसिद्धशांताबाई शेळके अरुणा ढेरे, पद्मा गोळे अश्या अनेक कवयित्रींचा जीवन परिचय प्रज्ञा कोरडे ,नीलिमा नातू ,करुणा शिंदे ,डॉ. सुवर्णा पाटील,चंदा वाडकर ,छाया दीक्षित,रश्मी मयेकर,स्मिता पेशवे मंदा हारंगुळकर यांनी करून दिला. सलग नऊ दिवस वेगळ्या वेगळ्या कवयित्रींच्या कार्याचा आढावा घेताना मराठीसाठी त्यांचे विशेष योगदान देखील अधोरेखित करण्यात आले.

विशेष बाब म्हणजे सदर लेखांवर मुलाखतवजा प्रश्नमंजुषा सुद्धा पार पडली.सलग नऊ दिवस लिहणाऱ्या आणि जास्तीत जास्त अचूक उत्तरे देणाऱ्या महिलांना महा विजेती म्हणून घोषित करण्यात आले. सदर उपक्रमासाठी ,मानसी नेवगी,सलोनी बोरकर,स्मिता हर्डीकर,सुप्रिया जोशी आणि अर्चना गोरे ह्यांनी परीक्षक म्हणून काम पहिले.

महिलांच्या प्रतिभेला वाव देणाऱ्या आणि आधुनिक स्त्री शक्तीची ओळख समाजास करून देणाऱ्या साहित्यिक,सामाजिक उपक्रमाचे कौतुक विविध स्तरांतून होत आहे.

## उर्दू घर उभारुन बाबा सिद्दीकी बीडमध्ये जुनी ईदगाह मैदानावर १ कोटींच्या कामाचे उद्घाटन; मुलींचे वसतिगृह उभारणार चे नाव देणार : डॉ.योगेश क्षीरसागर

बीड (प्रतिनिधी) दि.१५ : प्रलंबित असलेला उर्दू घर व मुस्लिम मुलींच्या वसतिगृहाचा प्रश्न येत्या वर्षभरात सोडविला जाईल. त्यासाठी शासन दरबारी सतत पाठपुरावा सुरू आहे. उर्दू घर उभारून त्याला राष्ट्रवादी काँग्रेसचे दिवंगत नेते बाबा सिद्दीकी यांचे नाव देण्याचा ठराव मी मुस्लिम बांधवांसमोर मांडला. या ठरावास सर्वांनी एकमुखाने पाठिंबा देत होकार दिला आहे, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिली. बीड शहरातील नाळवंडी नाका भागातील जुनी ईदगाह मैदानाचे सुशोभीकरण, बांधकाम यासाठी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून महाराष्ट्र सुवर्ण जयंती शहरी नगरोत्थान महाभियान (जिल्हास्तर) या योजनेतून १ कोटींचा निधी मंजूर केला होता. या कामाचे भूमिपूजन सोमवारी (दि.१४) डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आहे. हे केवळ बोलण्यापुरते मर्यादित न ठेवता अजितदादा व धनुभाऊ यांच्या



माध्यमातून कृतीतून सिद्ध करून दाखविले आहे. मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळासह अल्पसंख्यांकाच्या विविध योजनांसाठी कोट्यवधींची तरतूद महायुती सरकारने केली आहे. त्यामुळे समाजाचे खरे हितचिंतक कोण आहेत, हे ओळखण्याची गरज आहे. उर्दू घरासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. येत्या वर्षभरात उर्दू घर उभारून त्याला दिवंगत नेते बाबा सिद्दीकी यांचे नाव दिले जाईल. तसेच, अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मुस्लिम मुलींच्या वसतिगृहाचाही प्रश्न सोडविला जाईल, अशी ग्वाही डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिली. याप्रसंगी मुफ्ती मोहीयोद्दीन साहाब, मौलाना मुख्तार साहब, मौलाना सद्दर, हाफिज नदीर, हाफेज नजमुद्दीन साहाब यांच्यासह माजी नगरसेवक, मुस्लिम समाजातील प्रतिष्ठित नागरिक व मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### नाळवंडीत ईदगाह मैदानाचे सुशोभीकरण, बांधकामासाठी 27.50 लाखांचा निधी

बीड तालुक्यातील नाळवंडी येथे महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्यांक विकास विभागांतर्गत मुस्लिम बांधवांसाठी ईदगाह परिसर येथे २७.५० लाख रुपयांच्या निधीतून सुशोभीकरण व बांधकाम होणार आहे. या कामाचे भूमिपूजन डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी जि.प.सदस्य, सरपंच ॲड.राजेंद्र राऊत, उपसरपंच बंडू म्हेत्रे, ग्रा. पं.सदस्य गुलाब, नवगण शिक्षण संस्थेचे संचालक आमेर सिद्दिकी, शुभम कातांगळे, अरुण तंबरे, गणेश राऊत, गोरख काळे, वजीर, प्रदीप गायकवाड, खालेद, फारुख भाई, लल्लू खान, संजय काळे, गणी यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ख्रिश्चन स्मशानभूमीसाठी दिला 50 लाखांचा निधी

महाराष्ट्र अल्पसंख्यांक विभागाच्या योजनेतून बीड शहरातील अंकुश नगर भागातील ईडन गार्डन (ख्रिश्चन स्मशानभूमी) येथे ५० लक्ष रुपयांचा निधी दिला असून डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. यावेळी ख्रिश्चन धर्मगुरू चार्ल्स सोनवणे, नगरसेवक भीमराव वाघचौरे, गणेश वाघमारे, मरियन रेड्डी, आशिष शिंदे , किशोर पाटील, मथ्थू जोसेफ, पास्टर संजय गायकवाड, पा.अमृत सोनावणे, गजानन जवकर, बिपिन देशमुख, सुशांत सत्राळकर, प्रेमविजय भागतिलक आदी उपस्थित होते.

## बीड शहरामध्ये आदर्श आचारसंहितेचे पालन होण्यासाठी मुख्य अधिकारी अंधारे मॅडम यांनी लक्ष देण्याची गरज.

### भारतीय जनता पार्टीचे नेते तथा माजी सभापती नवनाथ शिराळे पाटील.

बीड प्रतिनिधी. सध्या महाराष्ट्र राज्यामध्ये येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सध्या आदर्श आचारसंहिता लागू झाली असून या आदर्श आचारसंहितेचे बीड जिल्ह्यामध्ये सर्वत्र पालन होण्याकरता जिल्हाधिकारी यांनी लक्ष देण्याची गरज आहे तसेच बीड शहरांमध्ये सर्वत्र आदर्श आचारसंहितेचे पालन होणे देखील तितकेच महत्त्वाचे आणि गरजेचे असल्याचे भारतीय जनता पार्टीचे नेते तथा माजी सभापती मा श्री नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील यांनी प्रसिद्धी पत्रकामध्ये म्हटले आहे बीड शहरांमध्ये सर्वत्र सध्या बोगस कामे युद्धपातळीवर चालू आहेत वर्क ऑर्डर नुसार हे कामे व्यवस्थित रित्या शहरांमध्ये पार पडावेत ज्या कामाचा कार्यारंभ आदेश झालेलं नाही असे काम तात्काळ या आदर्श आचारसंहितेच्या नियमानुसार नगरपरिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नीता अंधारे मॅडम यांनी लक्ष देऊन हे कामे तात्काळ बंद करावेत आणि ज्या कामाची वर्कर ऑर्डर तथा कार्यारंभ आदेश झालेला आहे असे काम जे चालू आहेत ते काम अतिशय दर्जेदारपणे व्हावेत यासाठी देखील मुख्य कार्यकारी अधिकारी नगर परिषद बीड यांनी लक्ष देणे गरजेचे आणि अतिशय महत्त्वाचे असल्याचे या ही या प्रसिद्धी पत्रकामध्ये म्हटले आहे तसेच बीड शहराच्या हद्दीमध्ये काही ठिकाणी बाकडे बसवले आहेत या बाकड्यावर ती देखील नावे टाकले आहेत तसेच हाऊसे नवसे गवसे असणारे नगरसेवक व तसेच स्वयंघोषित नेते व नगरसेवक



यांनी जसे काय त्यांच्या घरचे पैसे खर्च करूनच शहरांमध्ये विकास केला आहे की काय अशा पद्धतीने स्वतःचे नावे देऊन लोकांना संभ्रमित व मिस गाईड करण्याचे काम देखील सध्या बीड शहरांमध्ये काही ठिकाणी दिसून येत आहे हे देखील थांबले पाहिजे असी देखील मागणी बीड शहरातील नागरिकांमधून होत आहे तसेच बीड शहरांमध्ये सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे ते देखील नगरपालिकेच्या वतीने स्वच्छता विभागाच्या माध्यमातून स्वच्छ करणे गरजेचे आहे तसेच छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण या ठिकाणी देखील क्रांतिकारी महापुरुषांचे पुतळे आहेत मग या ठिकाणी राष्ट्रपिता महात्मा गांधी तसेच छत्रपती शाहू महाराज लोकमान्य टिळक जीवा महाले अशा महान क्रांतिकारी महापुरुषांचे पुतळे देखील बीड नगर परिषदेच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण या ठिकाणी बसवलेले आहेत येथे देखील अंधार आहे लाईट पथदिवे त्या ठिकाणी नाहीत म्हणून ते देखील दुरुस्त करावेत जेणेकरून महापुरुषांच्या असलेल्या पुतळ्याच्या ठिकाणी पावित्र्य राखल्या जाईन आणि असे अनेक प्रश्न बीड शहराच्या विकासाच्या बाबतीत आहेत जे कामे सध्या सुरू आहेत ज्या कामाच्या कार्यारंभ असलेल्या आदेशाच्या अनुषंगाने व्यवस्थितरित्या काम करून घ्यावेत असे देखील या प्रसिद्धी पत्रकाच्या माध्यमातून भारतीय जनता पार्टीचे नेते तथा माजी सभापती मा श्री नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील यांनी म्हटले आहे म्हणूनच एकंदरीत या सध्या सुरू असलेल्या आदर्श आचारसंहितेचे पालन बीड शहरांमध्ये होणे महत्त्वाचे आणि अतिशय गरजेचे आहे या करता बीड नगरपरिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नगरपरिषद बीड नीता अंधारे यांनी आपले लक्ष केंद्रित करून ही आदर्श आचारसंहिता कुठेही भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी असे ही या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे .

## विविध नवरात्र महोत्सवामध्ये रंगली प्रबोधनात्मक काव्यमैफिल

छत्रपती संभाजीनगर- विविध परंपरा, सण , उत्सव लाभलेल्या आपल्या भारत देशात अनेक सण उत्सवा निमित्त सर्वजन एकत्र येऊन सामाजिक एकात्मतेचा आदर्श देशात पेरतात. याच विचाराने प्रेरित होऊन छत्रपती संभाजी नगर शहरातील विविध नवरात्र उत्सव मंडळांनी विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन केले. यात प्रामुख्याने आपल्या कवितांतून समाजिक प्रबोधन करण्याऱ्या काव्यस्पंदन समुहाने सर्वांचे लक्ष वेधले आहे. दिं 04 ऑक्टोबर ते 11 ऑक्टोबर दरम्यान छत्रपती संभाजीनगर येथील 1) शारदा माता नवरात्री उत्सव, संघर्ष नगर, N-2 सिडको 2) शुभश्री कॉलनी, N-6 सिडको 3) नवदुर्गा नवरात्र उत्सव मंडळ, नवजीवन कॉलनी, हाडको 4) राजे शिवछत्रपती नवरात्र उत्सव मंडळ, बजाज नगर येथे काव्यामैफिल पार पडली.

खर तर कवी हा वास्तविकता दर्शवून समाजाला आरसा दाखवण्याचे काम करतो. याच वैचारिक दृष्टीने काव्यस्पंदन समुह छत्रपती संभाजीनगर शहरात कवितांमधुन विचारांचा जागर करत आहे. समाजातील विविध स्तरांतून या समुहातील सर्व कविंचे स्वागत तसेच अभिनंदन होत आहे. या काव्यमैफिली मध्ये कवी प्रा.डॉ सुशिल सातपुते, कवी श्री.विजयकुमार पांचाळ,कवी श्री.आर. पी शिखरे, कवी सौ.सुनिता कपाळे, कवी श्री.दिपक नागरे, कवि श्री.संदेश वाघमारे यांनी आपल्या रचनांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

समाजातील वाढती व्यसनाधिनता, महिलला वरील अत्याचार , महागाई, बेरोजगारी, दुरावत चाललेली नाती , वाईट चालीरिती या विषयांवर आधारित रचनांनी उत्कृष्ट प्रबोधन करण्याचे काम या काव्य मैफिली मार्फत केले जात आहे. खर तर अशा आयोजनांची समाजाला नितांत गरज आहे , जेणेकरून समाजाचे सामाजिक स्वास्थ सुदृढ होण्यास बळ मिळेल.

सामाजिक आशया बरोबरच नाती, शेती माती, हुंडाबळी आणि धार्मिक कवितांनी श्रोत्यांच्या हृदयाचा ठाव घेतला. सर्वच ठिकाणी कवितांना श्रोत्यांनी भरभरून दाद दिली यात सौ.सुनिता कपाळे यांची ‘बाप’ ही रचना, कवी आर. पी. शिखरे यांची मुलगी आणि वडीलांच नात सांगणारी ‘लेक’ ही रचना, कवी दिपक नागरे यांची ‘बहीण ‘ ही रचना कवी. संदेश वाघमारे यांची ‘खंत’ ही रचनानी प्रेक्षकांची मने जिंकली. याच बरोबर कवी डॉ.सुशिल सातपुते यांची ‘बरं झालं बाप्पा’ ही रचना आणि कवी श्री.विजय कुमार पांचाळ यांच ‘भक्षक’ ही रचना समाजातील वास्तव परिस्थिती दर्शवणारी ठरली.अशा उपक्रमांना समाजानेही पाठबळ दिले पाहिजे. जेणेकरून समाजात नवा आदर्श पेरला जाईल आणि एक विचारशिल पिढी घडवण्यास मदत होईल. या प्रबोधनात्मक काव्य मैफिलीचे बहारदार सूत्रसंचालन कवी प्रा. डॉ. सुशिल सातपुते आणि कवी श्री. विजयकुमार पांचाळ यांनी केले. या प्रबोधनात्मक काव्य मैफिलीचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## गेवराई पंचायत समिती गटविकास अधिकारी पदाचा अशोक राठोड यांनी स्विकारला पदभार

गेवराई : प्रतिनिधी

गेवराई येथील पंचायत समिती गटविकास अधिकारी पदाचा अशोक राठोड यांनी मंगळवारी पदभार स्विकारला. यावेळी त्यांचे पंचायत समिती प्रशासनाच्या वतीने स्वागत करण्यात आले. तसेच तालुक्यातील अनेकांनी त्यांना भेटून अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या.

गेवराई येथील पंचायत समिती कार्यालयाचा कारभार मागील काही महिण्यात मोठ्या प्रमाणावर रेंगाळला होता. यामुळे तालुक्यातील नागरिकांची कामे खोळंबली होती. तत्कालीन गटविकास अधिकारी श्रीमती कांबळे या कार्यालयात उपस्थित राहत नसल्याने त्यांच्याविषयी



तालुक्यातील नागरिकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला होता. त्यातच त्या चार दिवसांपूर्वीच दिर्घ रजेवर गेल्याने येथील पंचायत समितीचा कारभार पुर्णतः ठप्प झाला होता. दरम्यान जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशानुसार गेवराई गटविकास अधिकारी म्हणून अशोक राठोड यांना नियुक्ती देण्यात आली. यानंतर मंगळवारी दुपारी अशोक राठोड यांनी गेवराई पंचायत समिती गटविकास अधिकारी म्हणून पदभार स्विकारला. यावेळी पंचायत समिती प्रशासनाच्या वतीने अशोक राठोड यांचे स्वागत करण्यात आले. गटविकास अधिकारी म्हणून पदभार घेतलेले अशोक राठोड यांनी यापूर्वी गेवराई पंचायत समिती कार्यालयात तालुका कृषी अधिकारी म्हणून अनेक वर्षे काम पाहिलेले आहे. त्यामुळे त्यांना या तालुक्यातील कामकामाचा मोठा अनुभव असून एक कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून त्यांची तालुक्यात ओळख आहे. त्यांनी गटविकास अधिकारी पदाचा पदभार स्विकारल्याने तालुक्यातील अनेकांनी प्रत्यक्ष भेटून अशोक राठोड यांचे स्वागत करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### कामांना देणार प्राधान्य

**गेवराई पंचायत समितीचा मंगळवारी दुपारी अशोक राठोड यांनी गटविकास अधिकारी पदाचा कार्यभार स्वीकारला. दरम्यान आगामी काळात पंचायत समिती स्तरावरील विविध कामे वेळेत पूर्ण होण्यासाठी आपले प्राध्यान्य असेल, असे यावेळी अशोक राठोड यांनी यावेळी सांगितले.**

## मुंबई मध्ये धनगर समाज एसटी आरक्षण अमंलबजावणी करिता राज्य व्यापी निर्धार बैठक संपन्न.

भारत कवितके मुंबई कांदिवली पश्चिम. सोमवार दिनांक १४ आक्टोंबर २०२४ रोजी दुपारी ३ वाजता मुंबई मराठी पत्रकार संघ मुंबई, आझाद मैदान , महापालिका मार्ग, मुंबई ४००००१ या ठिकाणी धनगर समाज एसटी आरक्षण अमंलबजावणी करिता राज्य व्यापी निर्धार बैठक मोठ्या उत्साहात जल्लोषात शासनाच्या विरोधात घोषणा देत संपन्न झाली.सुरुवातीला विजय गोफणे यांनी आपल्या प्रास्ताविक मध्ये सांगितले की,” पुणे येथील सकल धनगर समाज, महाराष्ट्र राज्य आयोजित अधिवेशन, जेजुरी येथील जागर यात्रा, पंढरपूर येथील १६ दिवस सहा धनगर समाज बांधवांचे आमरण उपोषण, छत्रपती संभाजी नगर येथील उपोषण, आदिवासी विकास विभाग कार्यालयातून खिलारे कुटुंबातील सहा जणांचे धनगड जात वैधता प्रमाणपत्र रद्द करण्यात यश, मंत्रालयात जाळ्यात समाज बांधवांनी उड्या मारीत आंदोलन केले, सर्वांचे लक्ष वेधून घेतले, मुख्यमंत्री यांनी जीआर काढण्याची मुदत संपली,” उपोषण कर्ते गणेश केसकर, योगेश धरम, विजय तमनर, दिपक बोराडे, यांनी या निर्धार मेळाव्यात धनगर समाज बांधवां साठी प्रोत्साहन देणारे, उर्जा भरणारे भाषण केले.तसेच पांडुरंग मेरगळ, डॉ.मडम सोनटक्के, आणि प्रकाश आण्णा शेंडगे, यांनी जोश पूर्ण होशपूर्ण भाषणे केली. या निर्धार मेळावा मध्ये आचारसंहिता लागू होण्यापूर्वी जर आपल्याला एसटी आरक्षण अमंलबजावणी करिता जीआर काढला तर या सरकारला पाठिंबा द्यायचा, आणि जीआर नाही काढला तर येत्या निवडणुकीत सरकारला मतदान न करता पाडायचे,आपला उमेदवार निवडून आणायचा,यावर समाज बांधवांनी जोरदार घोषणाबाजी करत संघ दणाणून सोडला.आमदार प्रकाश आण्णा शेंडगे यांनी सांगितले की,” मुख्यमंत्री जीआर काढणार काढणार सांगतात पण प्रत्येक वेळी निराशा करतात.या कैबिनेट मध्ये जीआर ची घोषणा होईल.पण ती झाली नाही.या निर्धार मेळाव्यात मराठवाडा येथील धनगर समाज बांधवांची संस्था जास्त होती.उपोषण कर्ते गणेश केसकर यांनी सांगितले की” अडीच कोटी संख्या असलेला आपला धनगर समाज आंदोलनात मात्र कमी पडतो, ही खंत आहे.या निर्धार मेळावा मध्ये आमदार प्रकाश आण्णा शेंडगे, पांडुरंग मेरगळ, विजय गोफणे,दिपक बोराडे, गणेश केसकर, योगेश धरम , अनिल झोरे बिरु कोळेकर, डॉ.मडम सोनटक्के, इतर समाजातील मान्यवर व समाज बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.



दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
बुधवार १६ ऑक्टोबर २०२४
https://lokaarambh.com





# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजनेतून लाभार्थ्यांना वगळले

## मयुरी खेडकर यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार, आंदोलनाचा दिला इशारा

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना तसेच इतर गोरगरीबांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनेतून गेवराई तालुक्यातील अनेक गावे तसेच शेकडो लाभार्थ्यांना वगळण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी गेवराई विधानसभा मतदार संघाच्या नेत्या मयुरी खेडकर–मस्के यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली असून लाभार्थ्यांचा यादीत समावेश करण्याची मागणी केली आहे. दरम्यान घरकुलची मागणी केलेल्या लाभार्थ्यांचा सदरील घरकुल यादीत समावेश न केल्यास तिव्र आंदोलन छेडण्याचा इशारा या निवेदनाद्वारे मयुरी खेडकर–मस्के यांनी दिला आहे. राज्यात इतर मागास समाजातील नागरिकांसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल राबविण्यात येत आहे. याचबरोबर पंतप्रधान आवास योजना, यशवंतराव चव्हाण घरकुल योजना बंजारा, वंजारी, वडार समाज तसेच रमाई घरकुल योजना, शबरी घरकुल योजना या सुद्धा योजनेतून गोरगरीबांना घरकुल देऊन हक्काचा निवारा शासनाकडून दिला जातो. दरम्यान गेवराई तालुक्यातील गावागावातून या योजनेत गोरगरीबांनी अर्ज दाखल करुन घरकुलची मागणी केली होती. मात्र या घरकुल यादीतून गेवराई तालुक्यातील अनेक गावे तसेच मागणी केलेल्या शेकडो लोकांची नावे वगळण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. मंजूर घरकुल योजनेमुळे इतर मागास समाजातील कुटुंबांना हक्काचे घर मिळणार होते. मात्र मागणी केलेल्या गोरगरीबांची नावे यादीत आलीच नाहीत. त्यामुळे गरजू लाभार्थ्यांचा घरकुल यादीत समावेश का करण्यात आला नाही? असा प्रश्न गेवराई विधानसभा मतदार संघाच्या नेत्या मयुरी खेडकर–मस्के यांनी उपस्थित केला आहे. तसेच ज्या लोकांनी घरकुल मिळावे यासाठी अर्ज दाखल केले, त्यांच्यावर अन्याय न करता मागणी केलेल्या प्रत्येकाला घरकुल देण्यात यावे. त्याचबरोबर वगळण्यात आलेल्या गावांना सुद्धा यादीमध्ये समाविष्ट करावे, यादीमध्ये कुठल्याही प्रकारच्या व्यक्तींवर अन्याय होता कामा नये, याप्रकरणी बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्याकडे तक्रार देखील दाखल केली आहे. यामध्ये घरकुल योजनेतून वगळण्यात आलेल्या लाभार्थ्यांची नावे समावेश करण्याची मागणी करण्यात आली असून हि मागणी केलेल्या लाभार्थ्यांची नावे यादीत समावेश न केल्यास तिव्र आंदोलन छेडण्याचा इशारा मयुरी खेडकर–मस्के यांनी दिला आहे.

### विधानसभा निवडणुकांचं वेळापत्रक

- निवडणुकीचं नोटिफिकेशन - 22 ऑक्टोबर 2024
- अर्ज भरण्याची तारीख 29 ऑक्टोबर
- अर्ज माघार घेण्याची तारीख 4 नोव्हेंबर
- मतदानाची तारीख - 20 नोव्हेंबर
- मतमोजणी - 23 नोव्हेंबर

लोकसभा पोटनिवडणूक

- अर्ज भरण्याची तारीख 29 ऑक्टोबर
- अर्ज माघार घेण्याची तारीख - 4 नोव्हेंबर
- मतदानाची तारीख - 20 नोव्हेंबर
- मतमोजणी - 23 नोव्हेंबर

## लेखिका प्रज्ञा पंडित अष्टभुजा २०२४ पुरस्काराने सन्मानित.

लेखन, अध्यापन,, प्रवचन तसेच समाज कार्य इत्यादी अनेक क्षेत्रात स्वतःचा ठसा उमटविणाऱ्या लेखिका - समिक्षिका आणि प्रवचनकार प्रा.प्रज्ञा मनिष पंडित यांना ब्राह्मण बिझनेस नेटवर्क ग्रुप या संस्थेतर्फे 'अष्टभुजा २०२४' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ठाणे येथील परम बँक्वेट हॉल येथे आयोजित पुरस्कार वितरण कार्यक्रमात मंगळवार दिनांक 8 ऑक्टोबर 2024 रोजी निखिल बल्लाळ, प्रज्ञा पोंक्षे, निलेश दीक्षित यांच्या हस्ते हा पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष श्रीपाद कुलकर्णी, संस्थेच्या ठाणे विभाग प्रमुख सायली सहस्त्रबुद्धे, ठाणे विभाग सचिव मंदार बापट, खजिनदार मधुरा देशमुख, डिजिटल हेड मनिष पंडित आणि इतर अनेक मान्यवर उपस्थित होते. या प्रसंगी बोलताना प्रा. प्रज्ञा पंडित यांनी BBNG संस्थेने दिलेल्या सन्मानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली तसेच त्यांच्या आजवरच्या साहित्यिक, अध्यात्मिक आणि सामाजिक क्षेत्रांतील प्रवासाची थोडक्यात माहितीही त्यांनी उपस्थितांना करून दिली. ब्राह्मण उद्योजकांसाठी BBNG ने केलेले कार्य आणि त्याला ब्राह्मण समाजातून मिळणारा भरगोस प्रतिसाद याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. 'व्यक्त-अव्यक्त' या काव्यसंग्रहाद्वारे साहित्यक्षेत्रात पदार्पण करणाऱ्या प्रज्ञा पंडित यांची आजवर शैक्षणिक, साहित्यिक आणि अध्यात्मिक विषयांवर एकूण १९ पुस्तके प्रकाशित झाली आहेत त्यापैकी इंग्रजी माझ्या खिशात, मुलाखतीची गुरुकिल्ली, भारतीय खाद्यसंस्कृती, राष्ट्ररत्ने ही पुस्तके रसिकमान्य ठरलेली आहेत. 'इंग्रजी माझ्या खिशात', या विक्रमी पुस्तकाची पन्नासावी आवृत्ती प्रकाशित झालेली



असून ही पुस्तके महाराष्ट्रातील दुर्गम भागातील शाळांमध्ये तसेच आदिवासी पाड्यांवरील विद्यार्थ्यांना सामाजिक संस्था तसेच दानशूर व्यक्तींच्या मदतीने विनामूल्य देण्यात येत आहेत. 'प्रज्ञा स्तोत्र अध्ययन वर्ग' आणि ' तेजस्वी फाऊंडेशनच्या त्या संस्थापिका असून साहित्यिक, सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रात त्या अनेक उपक्रम राबवत आहेत. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी त्या भाषण कला वर्ग, इंग्रजी संभाषण वर्ग, पुस्तक परीक्षण तसेच सृजनात्मक लेखन मार्गदर्शन वर्ग घेत आहेत. त्यांनी आजवर विविध विषयांवरील शोधनिबंध लिहिलेले आहेत. तसेच विष्णू सहस्त्रनाम आणि वेद पुराणातील सुक्तांवर त्या निरुपण करत त्या धार्मिक परंपरेचा वारसा पुढे नेत आहेत. त्यांच्या ह्या शैक्षणिक, सामाजिक, साहित्यिक आणि धार्मिक योगदानासाठी त्यांना BBNG तर्फे 'अष्टभुजा २०२४' या मानाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

## पिक विमा मिळत नसल्याने विमा कंपनीवर कारवाई करण्याची शेतकऱ्याची मागणी




बीड (प्रतिनिधी)- प्रधानमंत्री फसल योजनेचा विमा काढून व नियमांचे पालन करुन देखील पिक विमा मिळत नाही त्यामुळे संबंधीत विमा कंपनी कायदेशीर कार्यवाही करा अशा मागणीचे शेतकरी वासुदेव ज्ञानोबा घुमरे यांनी जिल्हाधिकारी बीड यांना निवेदन दिले आहे. याबाबत माहिती अशी की, मौजे पारगांव (सिरस) ता.जि.बीड येथील शेतकरी वासुदेव घुमरे यांचे पारगाव परिसरात आहे त्यांनी प्रधानमंत्री फसल योजनेचा लाभ घेता यावा यासाठी नियमांचे पालन करुन सन 2020-21, 2021-22 आणि 2022-23 व 2023-24 चा शेती व्यवसायाला काही ना काही हातभार मिळेल अशी अपेक्षा पिक विमा भरुन केली होती परंतू त्यांना अद्यापही पिक विमा मिळत नसल्याने त्यांनी जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे लेखी तक्रार दिली असून संबंधित पिक विमा कंपनीवर कायदेशीर कार्यवाही करावी अशी मागणी केली आहे.

## मराठा मंडळ महिला समितीच्या उपक्रमात उत्साहात पार पडले प्रा.प्रज्ञा पंडित यांचे निरूपण

महिला समितीच्या विद्यमाने ,बुधवार दिनांक ०९ ऑक्टोबर २०२४ रोजी सायंकाळी ४.०० वाजता नवरात्री निमित्त कुंकुमार्जन , श्री सूक्त निरूपण आणि देवी तुळजाभवानीचा जागर या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी देवी तुळजाभवानी, श्री गणेश, छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज यांच्या प्रतिमाना पुष्प अर्पण करून देवी तुळजाभवानीची पूजा करत प्रथम सर्व महिलानी मिळून मराठा मंडळाच्या छत्रपती शिवाजी महाराज सांस्कृतिक केन्द्राच्या वास्तुमधे सकारात्मक ऊर्जा वृद्धिंगत होऊन सामाजिक,सांस्कृतिक ,शैक्षणिक ,क्रीड़ा,उद्योजकता* अशा सर्व क्षेत्रातील उत्तमोत्तम उपक्रम कार्यक्रम येथे नेहमी होवोत आणि समाजाला भविष्यातील उज्ज्वल दिशा देण्याचे कार्य घडो असा सामाजिक संकल्प केला आणि उपस्थित महिलांनी आपापल्या कुलदेवीच्या प्रतिकासमोर मनोभावे संकल्प करून कुंकुमार्जनास प्रारंभ केला. त्यानंतर श्रीसुक्ताचे निरूपण प्रा. प्रज्ञा पंडित यांनी सहज सोप्या पद्धतीने श्रीसूक्ताचा अर्थ सांगून श्रोत्यांची मने जिकली. शेवटी सर्वानी आणलेल्या प्रसादाचा नैवेद्य देवीस अर्पण करण्यात आला . कार्यक्रमाचे शेवटी देवीचा जागर करण्यात आला. यात जोगवा, देवीची स्तुति, देवीचा गोंधळ अशा विविध गाण्यांवर महिलानी फेर धरून नृत्य केले. देवीची गाणी सादर केली. अतिशय भक्तिमय वातावरणात , महिलांच्या उत्साही सहभागाने कार्यक्रमाची सांगता झाली. अतिशय प्रसन्न, सकारात्मक ऊर्जेने भारलेल्या वातावरणात कार्यक्रम संपन्न झाला.

## मनसेचे जिल्हा सचिव सोमेश कदम यांच्या रुग्णवाहिकेचे अमित ठाकरे यांच्या हस्ते लोकार्पण

बीड (प्रतिनिधी)-मनसेचे बीड जिल्हा सचिव सोमेश कदम यांनी सुरु केलेल्या राज ठाकरे वैद्यकीय मदत कक्षाचे आणी कार्डियाक रुग्णवाहिकेचे लोकार्पण मनसेचे नेते अमित ठाकरे हे छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित असलेल्या बैठकीस आले असता त्यांच्या हस्ते करण्यात आले. लोकार्पण सोहळ्या दरम्यान बोलतांना अमित ठाकरे म्हणाले की, मनसेचे बीड जिल्हा सचिव सोमेश कदम यांना सुरु असलेल्या



रुग्णसेवा ही कौतुकास्पद आहे. आज सद्यस्थितीत रुग्णांना हॉस्पिटलचा खर्च गरजू आणि गरीब न परवडणारा आहे त्याच अनुषंगाने राजसाहेब ठाकरे वैद्यकीय मदत कक्षाच्या माध्यमातून ही रुग्णसेवा अविरत सुरु अशीच राहावी जेणेकरुन नागरिकांना मदत होईल. यावेळी कार्यक्रमास असंख्य मनसेसैनिक उपस्थित होते.



पिठ्ठी येथे संत बाळूमामा जन्मोत्सव मोठ्या उस्तवात साजरा करण्यात आला यावेळी उपस्थित आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचे युवा नेते जयदत्त धस यांनी भेट दिली व सर्वांना जन्मोत्सवाच्या शुभेच्या दिल्या व त्यांचे मोठ्या जलोष्यात स्वागत करताना नारायण भोंडवे, युवा नेते राजेश कुडके सुनील इंगोले, अमोल कदम, अशोक सुपेकर, राजाभाऊ भोंडवे,, राजाभाऊ ढोरे, पवन भोसले व ग्रामस्थ उपस्थित होते

## जिल्ह्यात २९ रोजी रात्री २४ वाजेपर्यंत मनाई आदेश लागू

दिनांक:- 15-10-2024

बीड, दि. 15 (जि. मा. का.) :- मराठा, ओबीसी,धनगर व इत्तर समाजाचे, राजकीय पक्षाचे, संघटनांचे विविध प्रकारचे होणारे उपोषणे,आंदोलने, सभाचे अनुषंगाने तसेच आगामी काळात विधानसभा निवडणूका होणार आहे तसेच सद्या जिल्हयात राजकीय हलचाली व घडामोडीमुळे मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणेश्रस्ता रोको यासारखे आंदोलने सुरु असून किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होउन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच सद्याच्या कालावधीत मराठा,ओबीसी,धनगर आरक्षण मागणीसाठी सर्व समाज अक्रमक आहेत. या करिता कायदा व सुव्यवस्था अबाधित राहवी यासाठी मनाई आदेश जारी करण्यात आले असल्याचे अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी प्रसिध्दी पत्रकात नमूद केले आहे. दिनांक 15 ऑक्टोबर 2024 रोजीचे 00.01 वाजेपासून ते 29 ऑक्टोबर 2024 रोजीचे 24.00 वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा 37 (1) (3) अन्वये काढण्यात येणा-या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहावी या करीता कलम 37 (1) (3 ) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे.

शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या जवळपास खालील बाबीस मनाई करण्यात आली आहे. या अन्वये शस्त्र, सोटे ,काठी, तलवार, बंदूक, लाठया, काठया, कोणतेही दाहक पदार्थ, किंवा स्फोटके, दगड, किंवा इतर क्षेपाणस्त्रे, शरीरास इजा होणा-या वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. आवेशी भाषणे, अंगविक्षेप, विडांबनात्मक नकल, सभ्यता, नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षिता धोक्यात येईल, किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा फलक किंवा इतर कोणतीही वस्तू जवळ बाळगू नये.

जाहिरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे किंवा कोणतीही कृती जे देशाच्या संविधानातील मुल्यांच्या विरुध्द असेल किंवा देशाचा मान व सार्वभौमत्व यांना इजा पोहचणार असेल किंवा सार्वजनिक सुरक्षा आणि सामाजिक सलोखा यांना हानी पोहचणारी असेल, व्यक्तीच्या किंवा शवांच्या किंवा प्रेते किंवा आकृती,किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन यासाठी मनाई आहे. पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येता येणार नाही, मिरवणूका मोर्चे काढता येणार नाही.

कोणताही मोर्चा, सभा, मिरवणूक व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिका-यांची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूकीस लागु राहणार नाहीत व अशी कोणतीही मनाई राज्य शासनाच्या मंजूरीशिवाय 15 दिवसापेक्षा जास्त मुदतीपर्यंत अमलात राहणार नाही.

## गेवराई-जातेगाव- सेलू रस्त्यामुळे वीस ते पंचवीस गावच्या दळणवळनाचा मार्ग होणार सुकर - आ.लक्ष्मण पवार

### ११४ कोटी रुपयाच्या सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे आ.पवार यांच्या हस्ते उद्घाटन संपन्न

गेवराई (प्रतिनिधी) गेवराई विधानसभा मतदार संघातील सर्वच प्रमुख रस्त्याचे प्रश्न आता मार्गी लागले आहेत. तसेच गेल्या अनेक वर्षापासून जातेगाव-गेवराई या मुख्य रस्त्याची अवस्था बिकट झाली होती. याबाबत मी अनेक वेळा पाठपुरावा केल्यानंतर अखेर या रस्त्याला महाराष्ट्र राज्य पायाभूत विकास महामंडळ अंतर्गत मंजुरी मिळाली असून या रस्त्यामुळे आता ग्रामीण भागातील जनतेच्या दळणवळणाचा मार्ग सुकर होणार असल्याचे प्रतिपादन आ.लक्ष्मण पवार यांनी केले.

दि. 15 रोजी सकाळी केकत पांगरी येथे गेवराई - जातेगाव - सेलू या 114 कोटी रुपयांच्या सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे उदघाटन आ.लक्ष्मण पवार यांच्या हस्ते व युवा नेते शिवराज पवार यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्रकाश काका सुरवसे, राहुल जिजा खंडागळे, सुशील जवंजाळ, राजेंद्र राक्षभुवनकर, भगवान घुंबार्डे, प्रा.शाम कुंड, शिनुभाऊ बेदरे, दादासाहेब गिरी, मधुकर वादे, आप्पा कानगुडे, राम पवार, समाधान मस्के, अमोल मस्के, ईश्वर पवार, लक्ष्मण चव्हाण, मुन्ना शेठ यांच्यासह आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना आ.लक्ष्मण पवार यांनी सांगितले की, गेल्या दहा वर्षाच्या काळात आपण केलेली कामे ही जनतेच्या कायम स्मरणात राहतील. माझ्या परीने मी प्रामाणिक प्रयत्न करून मोठ्या प्रमाणात निधी आणून तालुक्याच्या तळागाळातील राष्ट्याव्हे प्रश्न मार्गी लावले. तसेच येणाऱ्या काळातही आपण आता जलसिंचनाच्या प्रश्नावर काम करणार आसल्याचे त्यांनी सांगितले. तर जातेगाव सर्कल मधील ग्रामीण भागातील जवळपास सर्व गावचे प्रमुख रस्ते यापूर्वी आपण पूर्ण केलेले आहेत. हाच मुख्य रस्ता बाकी होता आता तो ही मार्गी लावला आहे. हा पूर्ण रस्ता सिमेंट कॉंक्रीटने होणार असून तो दर्जेदार आणि टिकाऊ करून घेण्याची आपली जबाबदारी आहे. या



रस्त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांच्या दळवळणाचा मार्ग सुकर होणार असल्याचे त्यांनी यावेळी बोलताना सांगितले. या कार्यक्रमाला सरपंच ज्ञानेश्वर जाधव, बाळासाहेब लगड, कृष्णा पाटोळे, गोपाल चव्हाण, रमेश राठोड, छगन पवार, कृष्णा पवार, रमेश राठोड, लक्ष्मण कोकाट, दत्ता गिरे, शिवाजी राठोड, परमेश्वर गिरे, राजकीरण लगड, बाळू पांढरे, आत्माराम जगताप, विष्णू महाराज जगताप, कारभारी कोकरे, देवराज कोळे, दादासाहेब चव्हाण, पापा पंडित, प्रकाश पवार, सुरेश पवार, मोहन जाधव, भास्कर खवले यांच्यासह परिसरातील सरपंच, उपसरपंच, सर्व पदाधिकारी कार्यकर्ते यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## शस्त्र परवाना धारक यांनी शस्त्र पोलीस स्टेशनला जमा करण्याचे आवाहन.

बीड, 15 (जिमाका): भारत निवडणूक आयोग यांनी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 चा कार्यक्रम दिनांक 15आक्टोबर 2024 रोजी घोषीत केलेला आहे. त्याबाबतची आचारसंहिता दिनांक 15ऑक्टोबर 2024 रोजी पासून लागू झालेली असून सदर निवडणूका शांततेने व खुल्या वातावरणात पार पाडण्याचे तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत उपाययोजना करणे आवश्यक आहे. आदर्श आचार संहीतेमध्ये शस्त्र परवानाधारक यांचे परवान्यावरील मंजुर शस्त्र अनामत करणे बाबत निर्देश असून या निर्देशामध्ये निवडणूका जाहीर झाल्यापासून शस्त्रास्त्रे बाळगण्यास निर्बंध घालण्यात आले असून त्यानुसार स्क्रिनिग समितीच्या बैठकीत शस्त्र परवानाधारक यांचे शस्त्र अनामत करणे बाबत छाननी करण्यात आली आहे.

बीड जिल्हयाची विधानसभा सार्वत्रिक निवडणुक 2024, शांततेने व खुल्या वातावरणात पार पाडण्यासाठी संपूर्ण जिल्हयातील शस्त्र परवानाधारकांनी शस्त्रे (बँका,महत्वाची कार्यालये,संस्था,विद्युत केंद्र व इतर महत्वाची कार्यालये यांच्याकडील शस्त्र परवान्यावरील शस्त्र वगळून) इतर शस्त्रधारकांनी शस्त्रे जमा करणे आवश्यक असल्याने सदरची शस्त्रे आचारसंहिता कालावधीसाठी जमा करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी केले आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
बुधवार १६ ऑक्टोबर २०२४ पान क्रं - ४ PAGE NO 4



आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष- शरदचंद्र पवार पक्षाचे सर्वासर्वे आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब यांची विधानसभेच्या पार्श्वभूमीवर साहेबांचे पुणे येथील कार्यालय मोदीबाग येथे भेट व बीड विधानसभेच्या निवडणुकीबाबत सविस्तर चर्चा..!

# ८४ चा होऊ दे, की ९० चा: आता हा म्हातारा थांबणार नाही

**महाराष्ट्रातील विधानसभेच्या निवडणूकांच्या तारखा जाहीर होण्याच्या आधी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार यांनी एक मोठे विधान केले आहे. त्यांच्या विधानाने राजकारणात खळबळ उडाली आहे.**



महाराष्ट्र आणि झारखंड येथील विधानसभा निवडणूकांच्या तारखांची आज मंगळवारी घोषणा होणार असल्याने राजकारण ढवळले गेले आहे. या दरम्यान, राष्ट्रवादीचे नेते शरद पवार यांनी मोठे विधान केले आहे. एका कार्यक्रमात शरद पवार म्हणाले की काही तरुण मंडळी हातात फलक घेऊन उभी होती. त्यात माझा फोटो होता. ज्यात लिहीले होते की 84 वर्षांचा म्हातारा.. परंतू तुम्ही चिंता करुन नका. आम्हाला दुरपर्यंत जायचे आहे. हा म्हातारा माणूस काही थांबणारा नाही. मग 84 वर्षांचा होऊ दे की 90 चा ..हा म्हातारा तोपर्यंत थांबणार नाही जोपर्यंत महाराष्ट्र नीट रुळावर येणार नाही...

वास्तविक शरद पवार एका कार्यक्रमात भाषण करीत होते. त्यावेळी एका किस्सा सांगताना ते म्हणाले की काही तरुण मुलं हातात फलक घेऊन उभी होती. तरुण कार्यकर्त्यांचा इशारा होता की आता शरद पवार म्हातारे झाले आहेत त्यांनी राजकारण सोडून द्यायला हवे. त्यामुळे शरद पवार यांनी हे वक्तव्य केले आहे. शरद पवार यांच्या पक्षात गेल्यावर्षी फूट पडून त्यांचे पुतणे अजित पवार यांनी राष्ट्रवादी बळकावली होती. त्यानंतर अजित पवार यांनी महायुती सरकारमध्ये सामील होऊन उपमुख्यमंत्री पद मिळविले आहे.त्यानंतर अजित पवार यांनी अनेक शरद पवार यांच्या वयाचा उल्लेख करीत त्यांच्यावर टीका केली आहे. आपल्याला म्हातारा झाल्यावर संधी मिळणार का ? काही जण वय झाले तरी थांबायला तयार नाहीत अशी टीका अजित पवार यांनी केली आहे.

## निवडणूक आयोगाची पत्रकार परिषद

निवडणूक आयोग मंगळवारी दुपारी महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभा निवडणूक कार्यक्रमाची घोषणा करणार आहे. दुपारी 3.30 या संदर्भात पत्रकार परिषद होणार आहे. महाराष्ट्र विधानसभेचा कार्यकाळ 26 नोव्हेंबरला संपणार आहे. तर झारखंडचा कार्यकाळ पुढच्या वर्षी 5 जानेवारीला संपणार आहे.



## कांदिवली मध्ये जय मल्हार रिक्षा समुहाचे सामुहिक रिक्षा पूजन संपन्न झाले.

भारत कवितके मुंबई कांदिवली पश्चिम शनिवार दिनांक १२ आक्टोंबर २०२४रोजी सकाळी ११वाजता सेक्टर ३ चे मैदान, चारकोप येथे दसरा सणाच्या निमित्ताने कांदिवली मधील जय मल्हार रिक्षा समुहाचे सामुहिक रिक्षा पूजन संपन्न. सालाबादप्रमाणे याही वर्षी दसरा सणाच्या निमित्ताने कांदिवली पश्चिम येथील धनगर समाज बांधवांच्या जय मल्हार रिक्षा ग्रुप च्या सामुहिक रिक्षा पूजन धनगर स जयमाजाचे पत्रकार साहित्यिक गीतकार म्हणूनसामाजिक कार्यकर्ता प्रवक्ता भारत कवितके, जेष्ठ नागरिक दत्तात्रय लाळगे, मंडळ अध्यक्ष शिवाजी पिसे यांचे हस्ते सामुहिक रिक्षा पूजन करण्यात आले.भारत कवितके यांनी यावेळी सर्वांचे दसरा सणाच्या हार्दिक शुभेच्छा देऊन सांगितले की,” सध्या महाराष्ट्र राज्यातील तमाम धनगर समाज बांधव संविधान प्रविष्ट एसटी आरक्षण अमंलबजावणी करिता वेगवेगळ्या प्रकारची आंदोलने करीत आहेत. मात्र यात कांदिवली पश्चिम येथील धनगर समाज कुठेतरी कमी पडतो याची खंत वाटते. कळंबोळी या ठिकाणी धनगर समाजाच्या महिला सौ.जयश्रीताई श्रावण वाक्षे गेले सहा दिवस झाले आमरण उपोषणाला बसल्या आहेत. त्यांना तिथे जाऊन पाठिंबा देणे आपले कर्तव्य आहे.जमलेल्या रिक्षा समाज बांधवांनी आपल्या मुलांना मुलींना जास्तीत जास्त उच्च शिक्षण द्यावे, जेणेकरून तुमचे पुढील आयुष्यात सुख येईल.” यावेळी अध्यक्ष शिवाजी पिसे यांनी मार्गदर्शन केले.यावेळी भारत कवितके, शिवाजी पिसे, दत्तात्रय लाळगे ,लाळगे, मधुकर कुचेकर, महेंद्र काळे, तुकाराम देवडे, मल्हारी लाळगे, रविंद्र काळे संदिप वणवे,उदय बरगडे, श्रेयस लाळगे,आयर्न काळे,सोहन पिसे, आदीनाथ लाळगे, राहुल लाळगे कार्तिक वणवे,यश वणवे, हरिभाऊ जगदाळे, निवांत राणे,दगडू खाके, सतिश पिसे,व इतर समाज बांधव उपस्थित होते.

## अखेर कालिंदेश्वर मंदिर बिल्डरांच्या पाशातून मुक्त ; सामाजिक कार्यकर्त्यांच्या लढ्याला यश:- डॉ.गणेश ढवळे

दैनिक लोकआरंभ//

बीड:- ( दि.१५ ) बीड शहराच्या मोंढा परीसरातील बिंदुसरा नदीपात्राताशेजारील ५०० वर्षापुर्वीचे मराठवाड्याच्या मंदिरनिर्मिती प्रक्रियेतील महत्त्वाचा टप्पा असणारे द्विमितीय शिल्पांच्या दृष्टीने राजस्थानी शिल्प संस्कृतीतील शिल्प मराठवाड्याच्या मंदीर स्थापत्य इतिहासातील उल्लेखनीय दगडी आकर्षक महादेवाचे कालिंदेश्वर मंदिर हडप करण्याचा बिल्डरांचा डाव अखेरीस उधळला असुन तत्कालीन उपजिल्हाधिकारी (भुसुधार) प्रकाश आघाव यांनी देवस्थानची वर्ग २ ची जमिन वर्ग १ करण्याचे दिलेले आदेश बेकायदा ठरवत विद्यमान उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) शैलेश सुर्यवंशी यांनी रद्द केले आहेत. सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे, रामनाथ खोड,शेख युनुस आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी गेल्या ३ वर्षांपासून लक्ष्यवेधी आंदोलने करून शासन दरबारी पाठपुराव्याला अखेर यश आले आहे.

सविस्तर माहितीस्तव

ऐतिहासिक, पौराणिक वारसा लाभलेले शहर म्हणून बीड शहर ओळखले जाते.बीड शहराच्या मध्यभागातुन वाहणाऱ्या





बिंदुसरा नदीच्या काठावर अनेक ऐतिहासिक व पौराणिक वास्तु आहेत.बिंदुसरा धरणापासून ते ३ नद्यांचा त्रिवेणी संगम असलेल्या नामलगाव पर्यंत नदी पात्राच्या कडेला एकुण १२ महादेवांचे मंदिर असुन याला नदीपात्रातील १२ ज्योतिर्लिंग म्हणतात. यापैकी शहरातील श्रीकृष्ण मंदिराच्या पुढे बिंदुसरा नदीपात्राच्या पश्चिमेला फुलाई नगर भागात संपूर्ण दगडी बांधकाम असलेले महादेवाचे पुरातन कालिंदेश्वर मंदिर आहे.पुर रेषेच्या हद्दीत इनाम जमिनीमध्ये साधारणतः ५०० वर्षापुर्वीचे मंदिर असुन बाजुला ऐतिहासिक बारव आणि बारवा शेजारी एक ऐतिहासिक दर्गा आहे जो हिंदू मुस्लिम धर्माचे ऐक्याचे प्रतिक आहे.मात्र सदर ४६ गुंठे जमीन बिल्डरांनी बेकायदेशीर खरेदी केली.याठिकाणी अपार्टमेंट बांधकाम करतानाच नदीपात्राचा प्रवाह वळवुन सिमेंटची संरक्षण भिंत उभारून मंदिराची जागा बळकावली.याबाबत सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे, रामनाथ खोड, शेख युनुस यांनी व सहका-यांनी गेल्या ३ वर्षांपासून वारंवार निवेदने तसेच आंदोलनाद्वारे शासनाकडे पाठपुरावा केला. त्यामुळे अखेर तत्कालीन उपजिल्हाधिकारी (भुसुधार) प्रकाश आघाव यांनी सदर इनाम जमिन वर्ग दोनची वर्ग १ करण्याची परवानगी दिलेले आदेश उपजिल्हाधिकारी ( सामान्य प्रशासन) शैलेश सुर्यवंशी यांनी रद्द केले आहेत.याबाबत त्यांनी उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठातील शासकीय अभियोक्त्यांनाही कळविले आहे. गट नंबर १९३ मधील ४६ गुंठे जमीन भोगवटदार वर्ग २ मधुन भोगवटदार वर्ग १ करण्याची रमेश सोहनलाल सारडा यांना दिलेली परवानगी अनेक नियमांना बगल देत दिली असल्याचे या आदेशात म्हटले आहे.परवानगी देताना जिल्हाधिका-यांची मान्यता घेतलेली नाही.तहसिलदारांचा अहवाल न घेताच आधिकाराचा गैरवापर झाला.सदर इनाम जमिन सक्षम प्राधिकारी यांचे पुर्व परवानगी शिवाय वाटणी प्रबंध असताना जमिनीचे वाटपपत्र केल्यामुळे या प्रकरणात शर्थभंग झाल्याचे दिसून येते त्यामुळे जुना आदेश रद्द केल्याचे या आदेशात म्हटले आहे.

मुख्याधिकारी नगरपरिषद बीड निता अंधारेकडुन भुमाफियांची पाठराखण:- डॉ.गणेश ढवळे कालिंदेश्वर मंदिर परिसरात अतिक्रमित बांधकाम प्रकरणात कारवाई करण्यात यावी यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली “ शिवलिंग पुजन” “ नगरपरिषदेला प्रतिकात्मक श्रद्धांजली” “ जिल्हाधिकारी साहेब; बिंदुसरेला जाणुन घ्या “ आदि लक्ष्यवेधी आंदोलने करण्यात आली. आंदोलनाच्या अनुषंगाने डॉ.गणेश ढवळे यांच्या तक्रारीनंतर डॉ.निलम पाटील सहायक आयुक्त गट अ नगरपरिषद प्रशासन विभागीय आयुक्त कार्यालय औरंगाबाद यांनी दि.२२.०५.२०२३, दि.२९.०५.२०२३ आणि दि.०८.०६.२०२३ रोजी ३ वेळा मुख्याधिकारी नगरपरिषद बीड यांना नियमानुसार उचित कार्यवाही करण्याचे आदेश देऊनही सीईओ नीता अंधारे यांनी भुमाफियांची पाठराखणच केली.

शैलेश सुर्यवंशी यांचा धाडसी निर्णय :- रामनाथ खोड

बीड शहरातील बड्या बिल्डरांच्या बाबतीत बेकायदा जमिन वर्ग १ करण्याचा तत्कालीन उपजिल्हाधिकारी प्रकाश आघाव यांचा आदेश रद्द करणे हा विद्यमान उपजिल्हाधिकारी ( सामान्य प्रशासन)शैलेश सुर्यवंशी यांचा धाडसी निर्णय त्यांच्या कर्तव्यदक्षतेवर मोहोर उमटवणारा असुन या निर्णयामुळे देवही बिल्डरांच्या पाशातून मुक्त झाले असुन सामाजिक कार्यकर्ते यांना दिलासा देणारा निर्णय कौतुकास्पद असल्याची प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते रामनाथ खोड यांनी दिली आहे.

## विधानसभा निकालानंतर फक्त तीन दिवस, अन्यथा राज्यात राष्ट्रपती राजवट, काय आहे नेमके ते गणित

महाराष्ट्रात विधानसभेचा बिगूल वाजला. केंद्रीय निवडणूक आयोगाने १५ ऑक्टोंबर रोजी महाराष्ट्र आणि झारखंड विधानसभेच्या निवडणूक तारखांची घोषणा केली. आता राज्यात २० नोव्हेंबर २०२४ रोजी एकाच टप्प्यात मतदान होणार आहे. त्यानंतर २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. यापूर्वी २०१९ मध्ये राज्याच्या विधानसभेची निवडणूक २१ सप्टेंबर रोजी जाहीर झाली होती. म्हणजेच आता २०२४ मध्ये जवळपास एक महिना उशिराने निवडणूक होत आहे. २०१९ मध्ये राज्य विधानसभेचे मतदान २१ ऑक्टोंबरला मतदान झाले होते. त्यानंतर मतमोजणी आणि निकाल २४ ऑक्टोबर २०१९ रोजी लागले होते. परंतु आता २३ नोव्हेंबरला निकाल लागणार आहे. राज्य विधानसभेची मुदत २६ नोव्हेंबर २०२४ रोजी पूर्ण होत आहे. त्यामुळे निकालानंतर सरकार बनवण्यासाठी फक्त तीन दिवस असणार आहे. अन्यथा राज्यात राष्ट्रपती राजवट लागणार आहे.

अन्यथा राष्ट्रपती राजवट महाराष्ट्र विधानसभेचा निकाल २३ नोव्हेंबरला लागणार आहे. त्यानंतर निकाल आल्यानंतर उमेदवारांना प्रमाणपत्र दिले जाणार आहे. त्यानंतर बहुमत मिळालेल्या युती किंवा आघाडीकडून २४ नोव्हेंबर रोजी बैठक बोलवण्यात येणार आहे. त्यात युती किंवा आघाडीच्या नेतेपदाची निवड करण्यात येणार आहे. त्यानंतर २४ नोव्हेंबर रोजीच राज्यपालांकडे जाऊन सरकार बनवण्याचा दावा करणार आहे. राज्यपाल २५ नोव्हेंबर रोजी बहुमत असणाऱ्या सरकार बनवण्यासाठी बोलवणार आहे. त्यानंतर २६ नोव्हेंबर रोजी नवीन सरकारचा शपथविधी समारंभ घ्यावाच लागणार आहे. अन्यथा विधानसभेची मुदत संपत असल्याने राज्यात राष्ट्रपती राजवट लागू होणार आहे. २०१९ मध्ये असे घडले २०१९ मधील निवडणुकीत शिवसेना आणि भाजप युतीने एकत्र लढवली होती. परंतु निकालानंतर युती एकत्र राहिली नाही. देवेंद्र फडणवीस यांनी अजित पवार यांच्या सोबतीने शपथ घेतली. परंतु ते सरकार काही तासांचे राहिले. त्यानंतर राज्यातील राजकारणात ट्विस्ट आला. शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी एकत्र आली आणि उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाले. अडीच वर्षानंतर शिवसेनेत बंडखोरी झाली. एकनाथ शिंदे ४० आमदारांसह बाहेर पडले. भाजपसोबत सरकार स्थापन केले. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले. त्यानंतर वर्षभरापूर्वी अजित पवार महायुतीमध्ये आले. यंदा २०२४ मध्ये शिवसेना, भाजप आणि राष्ट्रवादी अशी महायुती निवडणूक रिंगणात उतरणार आहे. तसेच महविकास आघाडीत काँग्रेस, शरद पवार यांची राष्ट्रवादी आणि उद्धव ठाकरे यांची शिवसेना असणार आहे. मनसेकडून स्वबळाचा नारा देण्यात आला आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com